# <u>जाहिरात</u>

## <u>जिल्हा न्यायालय, वाशिम</u>

जिल्हा न्यायालय, वाशिम या आस्थापनेवर मंजुर असलेल्या व सद्यस्थितीत रिक्त असणा-या **"माळी"** या एक पदाकरिता उमेदवाराची निवड यादी तयार करणेसाठी, सदर पदाकरीता अर्ज करण्यासाठी विहित केलेल्या शेवटच्या दिनांकाला पात्रता निकष पूर्ण करणा-या निरोगी, इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदाची **वेतन मॅट्रीक्स एस-१ रु. १५०००-४७६००/- अधिक नियमानुसार देय भत्ते** अशी आहे.

**अ) <u>पात्रता</u> :-**

१. वयोमर्यादा :-

| **प्रवर्ग** | **किमान वयोमर्यादा** | **कमाल वयोमर्यादा** |
|---|---|---|
| अराखीव (खुला) | १८ वर्ष | ३८ वर्ष |
| अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा इतर मागास प्रवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाने निर्दिष्ट केलेल्या विशेष मागासवर्गीय उमेदवारांसाठी | १८ वर्ष | ४३ वर्ष |
| शारिरीक दृष्टया दिव्यांग उमेदवारांसाठी | १८ वर्ष | ४५ वर्ष |
| विहीत मार्गाने अर्ज करणा-या न्यायालयीन / शासकीय कर्मचा-यांसाठी | १८ वर्ष | वयाची अट नाही |

२. उमेदवार शारीरिकदृष्टया सक्षम, सुदृढ आणि निर्व्यसनी असावा.

३. उमेदवार कमीत कमी चौथी इयत्ता उत्तीर्ण असावा.

४. उमेदवारास किमान ३ वर्षाइतका बगीचे, हिरवळी, वनस्पती आणि झाडे इत्यादी सुस्थितीमध्ये ठेवण्याचा अनुभव असावा.

५. उमेदवारास मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

६. शासनमान्य माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करुन प्रमाणपत्र धारक उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

**ब) <u>पात्र उमेदवारीकरीताच्या अटी</u> :-**

१. उमेदवार करार करण्यास सक्षम असावा.

२. उमेदवारास नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात आले नसावे किंवा कोणत्याही न्यायालय / एम.पी.एस.सी. / यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याव्दारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडीमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकले नसावे किंवा अपात्र ठरविले नसावे.

३. उमेदवारास फौजदारी न्यायालयाने दोषी ठरविले नसावे किंवा त्याच्याविरुध्द फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

## क) <u>अर्ज सादर करण्याची प्रकिया / कालावधी</u> :-

१. उक्त नमुद पात्रता निकष आणि अटी पुर्ण करणा-या इच्छुक उमेदवारांनी दिनांक ०३/०४/२०२५ रोजी संध्याकाळी ०५:३० वाजेपर्यंत किंवा आधी पोहचेल या बेताने त्यांचे अर्ज **(जाहिरातीसोबत परिशिष्ट 'अ' नमुन्यात)** आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह खालील पत्यावर फक्त स्पीड पोस्ट (Speed Post) किंवा रजिस्टर्ड पोस्टाव्दारे (R.P.A.D.) पाठवावेत. अर्ज पाठवितांना पाकिटावर **'माळी पदासाठी अर्ज'** असे ठळक अक्षरात लिहावे.

**पत्ता :- मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,**
**जिल्हा व सत्र न्यायालय,**
**वाशिम-४४४ ५०५.**

२. स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर्ड पोस्टाव्यतिरिक्त इतर कोणत्याही माध्यमातुन किंवा वरील नमुद केलेल्या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३. जाहिरातीला अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाच्या संख्येनुसार व उमेदवारांच्या शौक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्तेनुसार अल्पसुचीचे (Shortlisting) करण्याचे सर्व अधिकार निवड समिती, जिल्हा न्यायालय, वाशिम यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

## ड) <u>परिक्षेची योजना</u> :-

१. आलेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर अल्पसुची प्रमाणे पात्र उमेदवारांना खालील निवड प्रकियेस सामोरे जावे लागेल.

| अ.क. | मुल्यांकन पध्दती | गुण |
|---|---|---|
| १ | प्रात्यक्षिक परीक्षा - (उद्यान, बगिचा देखभाली संदर्भात)<br>(उत्तीर्ण गुण किमान ५०% म्हणजे १५ गुण) | ३० |
| २ | शारीरिक क्षमता चाचणी | १० |
| ३ | वैयक्तिक मुलाखत | १० |
| **निवड प्रकियेचे एकुण गुण** | | **५०** |

**टिप १**: प्रात्यक्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास उमेदवारांचा उर्वरित परीक्षेसाठी विचार केला जाणार नाही. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना गुणवत्तेच्या आधारे पुढील चाचणीसाठी बोलविण्यात येईल.

**टिप २**: उमेदवारांची निवड ही प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक क्षमता चाचणी आणि मुलाखतीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे केली जाईल.

२. परिक्षेचे प्रवेश प्रमाणपत्र (Admit Card) पोस्टाद्वारे पाठविण्यात येतील. परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. पात्र उमेदवारांची यादी जिल्हा न्यायालय, वाशिमचे संकेतस्थळावर (https://washim.dcourts.gov.in/) प्रकाशित करण्यात येईल.

३. अल्पसुचीत पात्र उमेदवारांसाठी प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक क्षमता चाचणी तसेच वैयक्तिक मुलाखतीचे वेळापत्रक जिल्हा न्यायालय, वाशिमचे संकेतस्थळावर (https://washim.dcourts.gov.in/) वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. यासाठी उमेदवारांनी संकेतस्थळाला वेळोवेळी भेट द्यावी. ज्या पात्र उमेदवारांना प्रवेश प्रमाणपत्र (Admit Card) पोस्टाव्दारे मिळाले नसल्यास सदर उमेदवारांनी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधारकार्ड / निवडणुक आयोगाचे ओळखपत्र / पॅनकार्ड / वाहन चालविण्याचा परवाना / पासपोर्ट पैकी किमान कोणतेही एक मुळ ओळखपत्र तसेच मुळ ओळखपत्राची स्वतःप्रमाणित छायांकित प्रत सोबत आणल्यास प्रवेशाबाबत निवड समितीव्दारे विचार केला जाईल.

**इ) उमेदवारांनी अर्जासोबत खालील नमुद दाखल्यांच्या / प्रमाणपत्रांच्या स्वतःप्रमाणित (Self Attested) केलेल्या छायांकित प्रति सादर कराव्यात :-**

१. जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र / एस.एस.सी. चे बोर्ड प्रमाणपत्र) (School Leaving Certificate/Birth Certificate issued by Competent Authority/Board Certificate of SSC).

२. शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र

३. माळी पदाच्या कामासंदर्भात पुर्वानुभवाचा दाखला

४. सक्षम अधिका-याने प्रदान केलेला जातीचा दाखला (मागासवर्गीयांसाठी)

५. महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

६. सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

७. उमेदवाराच्या नावात बदल झालेला असल्यास नावाच्या बदलाबाबतचे शासकीय राजपत्राची प्रत सादर करावी.

**फ) उमेदवारांनी अर्जासोबत खालील मुळ दाखले / कागदपत्रे जोडावीत :-**

१. लहान कुटुंबाबाबत स्वयं घोषणापत्र (जाहीरातीसोबत नमुना 'अ' नुसार)

२. जाहिरात प्रसिध्दीनंतरची तारीख असलेली दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेले चारीत्र्य संपन्नतेविषयीचे दोन प्रमाणपत्र. त्यांचा हुद्दा, पत्ता व फोन नंबर सह (जाहीरातीसोबत नमुना 'ब' नुसार).

३. उमेदवार न्यायालयीन / शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिका-यांची (कार्यालयाची) मंजूरी घेतल्याचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

४. अर्जासोबत स्वतःचा पत्ता ठळक अक्षरात लिहिलेले पाच रुपयाचे पोस्टाचे टिकीट लावलेले रिकामे पाकिट पाठवावे.

५. दोन पासपोर्ट आकाराचे फोटो सोबत पाठवावे.

ज) **<u>उमेदवारांनी खालील नमुद बाबींची नोंद घ्यावी</u> :-**

१. माळी पदासाठी इ. ४ थी उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. उमेदवाराने इ. ४ थी अथवा त्यापूढील इयत्ता उत्तीर्ण असल्याबाबतची माहिती शैक्षणिक अर्हतेच्या रकान्यात भरावी.

२. मुलाखतीसाठी बोलविण्यात येणा-या उमेदवारांनी अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती पडताळणीसाठी सोबत आणाव्यात.

३. अर्ज विहीत नमुन्यात नसल्यास किंवा अपुर्ण असल्यास किंवा अर्जामधील माहिती खोटी असल्यास व योग्य प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती न जोडल्यास अर्ज बाद करण्याचा अधिकार निवड समितीकडे राहील.

**** उमेदवारांकरीता इतर आवश्यक सुचना ****

१. कोणत्याही वैध कारणामुळे भरती प्रक्रिया रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, याबाबत सर्व अधिकार निवड समिती, जिल्हा न्यायालय, वाशिम यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२. अपुर्ण / चुकीची माहिती असलेला अर्ज नाकारला जाईल. निवड प्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रकियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल अथवा त्यानंतर नियुक्ती झाल्यास त्याला / तिला पदावरुन काढुन टाकण्यात येईल.

३. अल्पसुचीत समाविष्ट उमेदवार जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजुन त्याला प्रात्यक्षिक परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती / नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास त्याचे / तिचे नाव निवड प्रकियेतुन वगळण्यात येईल.

४. केवळ अर्ज दाखल केला यावरुन उमेदवार चाचणी परीक्षा, मुलाखत किंवा नेमणूकीसाठी पात्र ठरणार नाही.

५. मुलाखतीसाठी बोलावण्यात येणा-या उमेदवारांनी त्यांनी अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती पडताळणीसाठी आणाव्यात. तसेच या कार्यालयास मान्य होईल असे स्वतःचे फोटो प्रमाणपत्र (Photo ID) जसे मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना इत्यादीपैकी एखादा पुरावा आणावा.

६. पात्र उमेदवारांना (नेमलेल्या तारखांना) प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक क्षमता चाचणी व तोंडी मुलाखतीसाठी स्वःखर्चाने हजर राहावे लागेल.

७. कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षीत घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते असा बदल वेळोवेळी जिल्हा न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://washim.dcourts.gov.in/) प्रसिध्द केला जाईल.

८. उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतीची सुचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस उमेदवार प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक चाचणी व तोंडी मुलाखतीसाठी अनुपस्थित राहिल्यास, जिल्हा न्यायालय निवड समितीकडुन या बाबत कोणतीही तक्रार / दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

९. उमेदवाराने दिलेला कोणताही तपशील खोटा किंवा चुकीचा असल्याचे आढळल्यास, उमेदवाराला निवड प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि नियुक्त झाल्यास त्याला काढुन टाकण्यात येईल. कोणतीही वस्तुस्थिती दडवल्यास अर्ज नाकारला जाईल.

१०. उमेदवाराने प्रात्यक्षिक परीक्षा तसेच शारीरिक क्षमता चाचणी परीक्षेमध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे, तसेच त्याच्या अर्जाची छाननी व त्याने तोंडी मुलाखतीचे वेळेस हजर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर तोंडी मुलाखतीची पात्रता अंतिमरित्या ठरविण्यात येईल. फक्त पात्र उमेदवारांचीच तोंडी मुलाखती घेण्यात येईल.

११. उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा जिल्हा न्यायालयात काम करणा-या अधिका-यांना / कर्मचा-यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर त्याच्या निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीशः अथवा इतर कोणामार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला निवड प्रक्रियेमधुन अपात्र ठरविण्यात येईल व यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१२. निवड यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमुद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामील होऊ शकला नाही तर त्याचे नाव निवड यादीतून काढुन टाकले जाईल.

१३. निवड यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरुवातीला अस्थायी स्वरुपाची असेल. स्थायीबाबतचे प्रमाणपत्र जारी होईपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केल्या जातील.

१४. या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

स्वा/-

**(एस. व्ही. हांडे)**

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,

वाशिम

वाशिम

दिनांक : १९/०३/२०२५

परिशिष्ट 'अ'

# जिल्हा न्यायालय, वाशिम

माळी पदासाठी भरती प्रकिया

उमेदवारी अर्ज

--------------------

अर्जदाराचा नुकताच काढलेला पासपोर्ट आकाराचा फोटो

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | उमेदवाराचे नांव (श्री/श्रीमती/कुमारी) (मराठी व इंग्रजी दोन्ही भाषेत) | :- | ______________________<br>आडनाव नाव वडील / पतीचे नाव<br>______________________<br>Surname First Name Middle Name |
| ०२. | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | :- | ______________________<br>______________________<br>______________________ |
| ०३. | कायमस्वरुपी संपूर्ण पत्ता | :- | ______________________<br>______________________<br>______________________ |
| ०४. | राष्ट्रीयत्व | :- | ______________________ |
| ०५. | संपर्क/भ्रमणध्वनी कमांक | :- | ______________________ |
| ०६. | ई-मेल, असल्यास | :- | ______________________ |
| ०७. | सेवायोजन कार्यालयातील नोंदणी कमांक, असल्यास | :- | ______________________ |
| ०८. | लिंग | :- | पुरुष / स्त्री / अन्य |
| ०९. | उमेदवार दिव्यांग आहे काय ? | :- | होय / नाही |
| १०. | उमेदवार सध्या शासकीय सेवेत आहे काय ? | :- | होय / नाही |

जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम

११. शासकीय सेवेत असल्यास कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र जोडले आहे काय ? होय / नाही

१२. उमेदवार प्रकल्पग्रस्त आहे काय ? :- होय / नाही

१३. उमेदवाराचे धर्म, जात व प्रवर्ग :- धर्म ______ जात ______ प्रवर्ग ______

१४. जातीचे प्रमाणपत्र आहे काय ? (मागासवर्गीयांसाठी) होय / नाही

१५. जन्मदिनांक (दिनांक/महिना/वर्ष) :- अंकात ____/____/______

अक्षरात ______________________

१६. दिनांक १९/०३/२०२५ रोजीचे वय :- ______ वर्ष ______ महिने ______ दिवस

१७. उमेदवार विवाहीत आहे काय ? :- होय / नाही

१८. हयात असलेल्या मुलांची संख्या :- ______________________

१९. २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या :- ______________________

२०. महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे काय ? होय / नाही

२१. उमेदवारास मराठी लिहिता/वाचता येते काय ? :- होय / नाही

२२. शैक्षणिक पात्रतेचा तपशिल :-

| अहर्ता | मंडळ/विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | प्राप्त गुण | कमाल गुण | प्राप्त गुणांची टक्केवारी | श्रेणी | किती प्रयत्नात उत्तीर्ण झाले |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

२३. अन्य अहर्ता, जसे संगणक/टंकलेखन /लघुलेखन, असल्यास तपशिल :- ______________________

______________________

______________________

जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम

२४. माळी कामाचा अनुभव :-

| अ.क्र. | अनुभव (संबंधित काम केलेल्या ठिकाणाचे/कार्यालयाचे नाव, दुरध्वनि कमांकासह) | कालावधी | | एकुण (वर्ष, महिने व दिवस) |
|---|---|---|---|---|
| | | दिनांकापासुन | दिनांकापर्यंत | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| **एकुण** | | | | |

२५. न्यायसंस्थेत कार्यरत नातेवाईकांचा संपूर्ण तपशिल, असल्यास. :- ____________

२६. उमेदवारास ओळखत असलेल्या दोन जबाबदार व्यक्तींची नांवे व पत्ता :- १. ____________

२. ____________

२७. उमेदवारा विरुध्द कोणतीही फौजदारी कार्यवाही प्रलंबित आहे काय ? असल्यास तपशिल. :- होय / नाही

२८. उमेदवारास फौजदारी न्यायालयाने दोषी ठरविले आहे काय ? असल्यास तपशिल. :- होय / नाही

२९. उमेदवारावर शिस्तभंगविषयक चौकशी प्रलंबित आहे काय ? असल्यास तपशिल. :- होय / नाही

३०. कोणत्याही न्यायालय / एम.पी.एस.सी. / यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याव्दारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडीमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमस्वरुपी काढुन टाकले आहे काय ? असल्यास तपशिल. :- होय / नाही

जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम

## : प्रतिज्ञापत्र :

मी ............................................................... राहणार ........................................, वय ............ वर्ष, प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो/करते की, प्रस्तुत अर्जात नमुद सर्व माहिती माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरी व बरोबर आहे. वर नमूद माहिती अथवा माहितीचा कोणताही भाग चुकीचा/खोटा असल्याचे आढळून आल्यास मी प्रस्तुत भरती प्रकियेसाठी आपोआप अपात्र ठरेल आणि तसेच जर माझी निवड/नियुक्ति झाल्यास, कोणत्याही पूर्वसुचनेशिवाय मला सेवेतून काढुन टाकण्यात येईल हे मला मान्य आहे.

दिनांक :-

उमेदवाराची स्वाक्षरी :- ______________________

ठिकाण :-

उमेदवाराचे नांव :-

जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम

नमुना 'अ'

## : घोषणापत्र :

१. मी माळी या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२. आज रोजी मला .............. (संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............................... आहे. (असल्यास जन्मतारीख नमुद करावा).

३. जाहिरातीच्या तारखेस माझे हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असल्यास दिनांक २८ मार्च, २००६ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे मी या पदासाठी अपात्र ठरेल याची मला जाणीव आहे.

४. मी असेही घोषित करतो/करते की, माझेविरुध्द यापूर्वी कोणताही फौजदारी खटला झालेला नाही आणि/अथवा सध्या प्रलंबित नाही. तसेच मला कोणत्याही फौजदारी गुन्ह्यात शिक्षा झालेली नाही. याशिवाय, माझेविरुध्द कोणतीही शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रलंबित नाही अथवा पूर्वी झालेली नाही.

५. उमेदवारी अर्ज सादर केला म्हणून मला चाचणी/मुलाखतीस बोलविणे जाण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची मला जाणीव आहे.

दिनांक :- उमेदवाराची स्वाक्षरी :- ______________________

ठिकाण :- उमेदवाराचे नांव :-

जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक

नमुना 'ब'

**चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कुमारी ______________________________ हे/हया ______________, तालुका _______________, जिल्हा _______________, येथील रहिवासी असुन, मी त्यांना मागील ___________ वर्षांपासून ओळखतो. त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते/त्या माझे/माझ्या नातेवाईक नाहीत.

करिता सदरील वर्तणूक/चारित्र्य प्रमाणपत्र देण्यात येत आहे/ दिले आहे.

प्रमाणपत्र देणा-याचे नांव व सही

पत्ता :- __________________________

__________________________

ठिकाण :- __________________________

दिनांक :- भ्रमणध्वनी कमांक :-

जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम